## नि. क्र. १५ व १६ वरील आदेश

१. अर्जदाराने प्रस्तुतचे अर्ज मयत वादीच्या वारसानांना मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे अबेटमेंट चा आदेश रद्द करुन मयत वादीच्या वारसानांना दाव्यात समाविष्ट करुन घेण्याची परवानगी मिळण्याबाबत केलेला आहे.

२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे मुळ वादी गणेश फुलचंद आकोडे यांचा दि. १९.०७.२०१९ रोजी निधन झाले असून मयत वादीच्या वारसानांना दाव्यात वारस म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. अर्जदारास दाव्याची माहिती नसल्यामुळे मयत वादीच्या वारसानांना अभिलेखावर घेणे व अबेटमेंट चा आदेश रद्द होवून मिळण्याबाबत अर्ज मान्य करण्यात यावा अशी अर्जदाराने विनंती केली आहे.

३. याउलट प्रतिवादींने नि. क्र. १७ अन्वये त्याचे लेखी म्हणणे दाखल करुन अर्जदाराच्या अर्जास प्रखर विरोध केला आहे. अर्जदारातर्फे ॲड. पराडकर यांनी युक्तीवाद केला व प्रतिवादी तर्फे ॲड. टोपले यांनी युक्तीवाद केला.

४. दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तुतचा दावा हे घोषणा, ताबा हा अनिवार्य तसेच कायमच्या मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे. अर्जदाराने मयत वादीचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्याचे अवलोकन केले असता मयत गणेश फुलचंद आकोडे यांचे निधन दि. १९.०७.२०१९ रोजी झाले असल्याचे दिसुन येते. वादीच्या निधनानंतर त्याच्या वारसानांना सदरचा दावा चालविण्याचा अधिकार अस्तित्वात आहे. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हे शपथपत्रावर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता अर्जदार क्र. १ व २ व्यतिरीक्त मय्यत वादीचे इतर कोणतेही वारस नाही. अर्जदाराने शपथपत्रावर सांगितले आहे की, तिला कायद्याबाबत व प्रस्तुत प्रकरणाबाबत माहीती नव्हती. डिसेंबरच्या शेवटच्या आठवडयात तिला प्रस्तुत प्रकरणाबाबतचे दस्ताऐवज प्राप्त झाल्याने दाव्याबाबतची माहीती झाली व त्यानंतर तिने विधीज्ञांशी संपर्क साधुन योग्य ती

कार्यवाही केली. अर्जदाराने उपरोक्त कथन हे तिच्या शपथपत्रावर केले असल्याने त्यावर अविश्वास दाखविण्यासारखे काही नाही. त्यामुळे अर्जदाराने दाव्यात मय्यत वादीचे वारस म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता मय्यत वादीच्या वारसानांना समाविष्ट करणे गरजेचे आहे. त्यामुळे अबेटमेंट रद्द करुन वादीचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास वादीस नुकसान होईल. त्यामुळे मय्यत वादीच्या वारसानांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करणे व अबेटमेंट रद्द करणे न्यायोउचित होईल. त्यामुळे मी खालील ओदश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा दोन्ही अर्ज नि. क्र. १५ व १६ मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १ व २ यांनी मय्यत वादीचे वारस म्हणून अभिलेखावर घेण्यास झालेल्या उशिराबाबत अबेटमेंट चा आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. अर्जदारास वादीच्या वारसानांना प्रस्तुत दाव्यास समाविष्ट करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Manjusha Manikrao Alone
Digitally signed by Manjusha Manikrao Alone
Date: 2020.10.15 13:34:22 +0530

(कु. एम. एम. अलोणे)

ठिकाणः कारंजा घा.
दि. १३.१०.२०२०

दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर,
कारंजा घा.